अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. ०८ डिसेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ६९ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## आयसीसीकडून टी-२० वर्ल्डकपच्या नव्या लोगोचे अनावरण

**मुंबई :** वेस्ट इंडीज आणि युएसएमध्ये होणाऱ्या आयसीसी टी २० वर्ल्डकपला अवघे काही महिने शिल्लक राहिले आहेत. सर्व सहभागी देश आपल्या संघाची बांधणी करण्याच्या तयारीला लागले आहेत. दरम्यान, आयसीसीने टी-२० वर्ल्डकपचा नवा लोगो प्रसिद्ध केला आहे.

आयसीसीने आज अधिकृत वक्तव्य प्रसिद्ध केलं. त्यात ते म्हणातात, 'सर्वात मोठी आंतरराष्ट्रीय टी २० क्रिकेट स्पर्धेनं नुकतीच कात टाकली आहे. आता आयसीसी टी २० वर्ल्डकपला नवीन ओळख मिळणार आहे. हा क्रिकेट प्रकार हा त्याच्या वेगवान घडामोडींसाठी प्रसिद्ध आहे. आता याला एक डायनामिक ओळख मिळणार आहे. ही ओळख या खेळाची सळसळती उर्जा दर्शवणारी असणार आहे.' आयसीसीच्या या नव्या लोगोमध्ये बॅट, बॉल आणि खेळातील उर्जेचा कल्पकपणे मिश्रण केले आहे. टी २० क्रिकेटमध्ये आक्रमक फलंदाजीला फार महत्व आहे. त्याचा वापर या लोगोत करण्यात आला आहे. बॅट स्विंगमुळे सामन्याचा निकाल कसा बदलू शकतो याचं हे प्रतीक आहे.आयसीसी टी २० वर्ल्डकप हा जून महिन्यात वेस्ट इंडीज आणि युएसएमध्ये होणार आहे. या स्पर्धेत जवळपास २० संघ पात्र झाले असून या संघाचे विभागणी चार ग्रुपमध्ये केली आहे. प्रत्येक ग्रुपमध्ये ५ संघांचा समावेश आहे.

# आयकर विभागाची धाड; सापडले ५० कोटींचे गभाड

### आयकर विभागाचा ओदिशा आणि झारखंडमधील बौद्ध डिस्टिलरीज प्रायव्हेट लिमिटेडवर छापा

सुराज्य/वृत्तसंस्था

**अजय देवगणचा रेड चित्रपट आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या खऱ्याखुऱ्या छापेमारीवर आधारित आहे. याच चित्रपटाची आठवण पुन्हा झाली ती म्हणजे, आयकर विभागाने ओडिशा आणि झारखंडमधील बौद्ध डिस्टिलरीज प्रायव्हेट लिमिटेडवर केलेल्या छापेमारीमुळे. या छापेमारीत कंपनीशी संबंधित परिसरातून आयकर विभागानं आतापर्यंत या छापेमारीत तब्बल ५० कोटी रुपये जप्त केले आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे, या छापेमारीत आयकर विभागानं जप्त केलेली रोकड इतकी आहे की, मोजणी करता करता चक्क नोटा मोजण्याची मशिनच बंद पडली.**





आयकर विभागाने ओडिशातील बोलंगीर, संबलपूर आणि झारखंडमधील रांची, लोहरदगा येथील बौद्ध डिस्टिलरीज प्रायव्हेट लिमिटेडच्या मालमत्तांवर कारवाई केली आहे. ही छापेमारी अजुनही सुरूच आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारपर्यंत या छापेमारीत जप्त करण्यात आलेल्या रक्कमेपैकी तब्बल ५० कोटी रुपयांच्या नोटांची मोजणी पूर्ण झाली होती, मात्र तरीही मोठ्या प्रमाणावर नोटा शिल्लक होत्या. नोटांची संख्या इतकी जास्त होती की, नोटा मोजण्यासाठी आणलेल्या मशीनही थकल्या आणि त्या बंद पडल्या.

बुधवारी सकाळपर्यंत आयकर विभागाच्या पथकानं ५० कोटी रुपये जप्त करून त्यांची मोजणी केली. यावरुनच आयकर विभागाच्या छापेमारीत किती मोठी रोकड सापडली आहे याचा अंदाज तुम्हाला येऊच शकतो. महत्त्वाची बाब म्हणजे, अद्याप छापेमारी संपलेली नाही. अजुनही छापेमारी सुरू असून आयकर विभागाचे लोक अजूनही बौद्ध डिस्टिलरीजच्या आवारात उपस्थित आहेत आणि कारवाई सुरू आहे.

### कुठे-कुठे कारवाई?

बौद्ध डिस्टिलरीज सोबतच झारखंडचे प्रसिद्ध उद्योगपती आणि व्यापारी रामचंद्र रुंगटा यांच्या घरावरही आयकर विभागानं छापे टाकले आहेत. प्राप्तिकर विभाग सकाळपासून रामगढ, रांची आणि इतर ठिकाणांसह रुंगटा यांच्या निवासस्थानावर आणि प्रतिष्ठानांवर छापेमारी करत आहेत. रामगड आणि रांची येथील रामचंद्र रुंगटा येथील अनेक ठिकाणी सर्वेक्षण सुरू असल्याचं सांगण्यात येत आहे. सीआरपीएफचे जवान येथे आयकर अधिकाऱ्यांना सुरक्षा पुरवत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, रामगढ जिल्ह्यांत अनेक ठिकाणी कारखाने आणि निवासस्थानांची चौकशी सुरू आहे. रामगढ शहरातील पंजाब नॅशनल बँकेजवळ असलेल्या रामचंद्र रुंगटा यांच्या निवासी कार्यालयात सकाळपासूनच अधिकारी एकत्र आले आणि कारवाई सुरू केली. अधिकारी पाच वाहनांतून घटनास्थळी दाखल झाले होते.

# नवाब मलिकांना महायुतीत घेऊ नका

### फडणवीसांचे अजित पवारांना पत्र



सुराज्य/मुंबई

जामिनावर असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार नवाब मलिक हे आज अजित पवार गटात सहभागी होत सत्ताधारी बाकावर बसले. मलिक हे सत्ताधारी बाकांवर बसल्याने भाजपवरही टीका होऊ लागली असताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवारांना पत्र लिहित विरोध केला आहे.

सत्ता येते जाते, पण देश महत्वाचा. त्यांना देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक झाली होती. त्यामुळे त्यांना महायुतीमध्ये सामावून घेता कामा नये असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. विधिमंडळ अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सत्ताधाऱ्यांमधील मतभेद समोर येऊ लागल्याची चर्चा सुरु आहे. राज्याच्या राजकारणात फडणवीस यांच्या पत्रानंतर खळबळ उडाली असून शिवसेना ठाकरे गटाने भाजपवर बोचरा वार केला आहे. सत्तेपेक्षा देश मोठा असं जर आपल्याला वाटत असेल तर मग आतापर्यंत ज्या ज्या लोकांवर भाजपाने आरोप केले त्यांना सत्तेत सामावून घेताना हा विवेकवाद कुठं गेला होता, असा सवाल ठाकरे गटाने केला आहे.

### पत्र न लिहिता फोन करुनही सांगू शकले असते : सुळे



फडणवीसांच्या या पत्रावर खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली. देवेंद्र फडणवीस हे पत्र न लिहिता अजित पवारांना फोन करुनही सांगू शकत होते. त्यामुळे हे सगळं षडयंत्र असल्याची शंका येत असल्याची प्रतिक्रिया सुळेंनी दिली. तसेच राष्ट्रवादीचे नेते जेलमध्ये होते तेव्हा मी सर्वांना भेटले. अडचणीच्या काळात सोबत राहावं लागतं. प्रत्येक वेळी आम्ही त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या सोबत होतो. नवाब मलिकांवर माझा पूर्ण विश्वास असून त्यांच्या मागे सुप्रिया सुळे पूर्ण ताकदीने उभी राहिल, असा विश्वास देखील सुप्रिया सुळे यांनी यावेळी व्यक्त केला.

### अजितदादांना सत्तेत घेताना देश मोठा वाटला नाही का?

दिवसभरातल्या एकूण घडामोडी पाहता, पत्रामध्ये ते सत्तेपेक्षा देश मोठा असेही म्हणत आहेत. परंतु देवेंद्रजींना आम्हाला साधा प्रश्न विचारायचा आहे, सत्तेपेक्षा देश मोठा असं जर आपल्याला वाटत असेल तर मग आतापर्यंत ज्या ज्या लोकांवर भाजपाने आरोप केले, त्यांना (अजित पवारांना) सत्तेत सामावून घेताना हा विवेक कुठे गेला होता?

## दोन तरुणांच्या सतर्कतेमुळे कुर्डुवाडीत किराणा दुकान लुटण्याचा प्रयत्न फसला




सुराज्य/कुर्डूवाडी

कुर्डुवाडी-बार्शी बाह्यवळण रस्त्यावरील न्यू दरलिंग किराणा दुकानाचे शटर उचकटून किराणा साहित्य चोरून घेऊन जात असताना परिसरातील दोन तरुणांच्या सतर्कतेमुळे चोरट्यांचा दुकान लुटून नेण्याचा प्रयत्न फसला. ही घटना गुरुवार, दि. ७ डिसेंबर रोजी पहाटे तीन वाजताच्या सुमारास घडली.

दरलिंग किराणा दुकानात चोरी करण्यापूर्वी दुकानाच्या पाठीमागून कंपाऊंडची तार कट करून चोरटे दुकानाजवळ आले. सीसीटीव्ही व बाहेरच्या लाईटीची वायरी तोडल्यानंतर शटर उचकटून किराणाचे साहित्य बाहेर काढत दुकानाजवळील रस्त्यालगत खड्ड्यामध्ये ठेवण्याचे काम सुरु होते. दरम्यान, परिसरात राहणारे दोन तरुण चारचाकी वाहनातून घराकडे निघाले असताना त्यांच्या गाडीचा लाईटचा उजेड दुकानावर पडले. त्यावेळी काहीजण शटर उचकटत असल्याचे त्यांच्या निवदर्शनास आले. त्यानंतर परिसरातील नागरिक जागे झाल्याने चोरटे पसार झाले. त्यामुळे चोरीचा प्रयत्न फसला. चोरट्यांनी दुकानाच्या गल्ल्यातील १ हजार ५०० रोख रक्कम चोरून नेली. यावेळी ३० किलोचे ५ तांदुळाचे कट्टे ९ हजार रुपये, १ लिटर तेलाचे ८ बॉक्स ८ हजार रुपये व १५ लिटर तेलाचे ६ डब्बे ६ हजार ९०० रुपये किमतीचे साहित्य घेऊन जाण्यासाठी बाहेर काढले होते.

### ■ दरवर्षी होते चोरी

दरलिंग किराणा दुकानाची दरवर्षी दिवाळीआधी किंवा दिवाळीनंतर चोरी होत असते. असे सलग तीन वर्षे किराणा साहित्याची चोरी झाली आहे. यामध्ये दोन ते चार लाख असे एकूण अंदाजे ९ लाख रूपयांचे किराणा साहित्याची चोरी झाली आहे. मात्र यावेळी केवळ पंधराशे रुपयांची चोरी झाली.

### ■ पहाटे तीनच्या दरम्यान चोरी

कुर्डुवाडी बाह्यवळण रस्त्यावरील तुकाराम नगर परिसरात घर फोडून ७० हजार रुपयाची चोरी झाली होती. यानंतर ७ डिसेंबर रोजी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास किराणा दुकानाचे शटर उचकटून चोरट्यांनी किराणा साहित्य चोरीचा प्रयत्न केला. त्यामुळे या परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रारंभी दुकानाबाहेर लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेरे व लाईटच्या वायर बांबूला हूक लाऊन तोडण्यात आले होते.

## बार्शीतील कंपनीत बारा लाखांचा अपहार; व्यवस्थापकाला अटक

सुराज्य/बार्शी




श्रीराम फिलामेंट्स या कंपनीत बनावट कागद पत्राद्वारे १० लाख ८९ हजार रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी कंपनीच्या व्यवस्थापकाविरुद्ध पोलिसांनी फसवणूक, अपहाराचा गुन्हा दाखल केला आह .

यासंदर्भात कंपनीचे कर्मचारी विजयकुमार लढा यांनी बार्शी शहर पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी जाकिर इमाम मुलाणी (मंगळवार पेठ, बार्शी) याला अटक करून पोलीस कोठडी घेतली आहे. जाकिर मुलाणी हा फिलामेंट्स कंपनीत मॅनेजर म्हणून कामाला होता. त्याने ऑक्टोबर २२ ते जून २०२३ या कालावधीत बनावट कॅश व्हाऊचर तयार करून त्याद्वारे १० लाख ८९ हजार रुपये काढून त्या रकमेचा अपहार केला. अशी नोंद पोलिसात झाली. फौजदार कर्णे वाड तपास करीत आहेत.

## रेल्वेत नोकरी लावतो म्हणून तरुणास १२ लाखास गंडविले

### महिलेसह ७ जणांवर गुन्हा



**माळशिरस :** मध्य रेल्वेत तिकिट तपासणीस म्हणून नोकरी लावण्याचे आमिष दाखवून एका सुशिक्षीत तरुणास १२ लाख रुपयास गंडविल्याची घटना माळशिरस तालुक्यात नुकतीच उघडकीस आली.

या प्रकरणात माळशिरसच्या पोलिसांनी एका महिलेसह ७ जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केलो. अभिषेक धनंजय अरवले (वय-२२, मेडद, माळशिरस) असे फसवणूक झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याची फसवणूक केल्याप्रकरणी जालिंदर पांडुरंग कदम, विष्णू गलांडे, त्याची पत्नी लक्ष्मी गलांडे, मुलगा शुभम गलांडे (खुडूस) संदीप देशमुख, तन्मय जाधव, साहिल हुवाळे (सोलापूर) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. त्यापैकी जालिंदर कदमने अभिषेक याला रेल्वेत टीसी या पदावरती नोकरी लावतो, म्हणून संगनमताने त्याच्याकडून पैसे घेतले होते. त्याला मुंबई,पुणे येथील रेल्वे कार्यालयात नेले होते. त्याला बनावट जॉईनिंग लेटर, आयडेंटी कार्ड दिले. हा प्रकार जून दि. २२ ते नोव्हेंबर या कालावधीत घडला. जॉइनिंग लेटर नकली असल्याचे समजल्यानंतर अरवले याने पोलिसात तक्रार दाखल केली. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक घोळकर करीत आहेत.

## आमदार अपात्रता प्रकरण; शिंदे गटाची उलटतपासणी

**नागपूर :** महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू झाले आहेत. अनेकविध मुद्द्यांवरून सत्ताधारी आणि विरोधक आमनेसामने आल्याचे पाहायला मिळाले. यातच आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी नागपूर विधिमंडळात कायम ठेवण्यात आली.

ठाकरे गटाची उलटतपासणी झाल्यानंतर आता शिवसेना शिंदे गटातील आमदारांची उलटतपासणी सुरू झाली आहे. ठाकरे गटाचे वकील देवदत्त कामत यांच्याकडून शिंदे गटाच्या आमदारांची उलटतपासणी सुरू असून आमदार दिलीप लांडे यांची पहिल्यांदा उलटतपासणी करण्यात आली. कामत यांनी प्रतिज्ञापत्रातील काही परिच्छेदांबाबत प्रश्न विचारले.. तुम्ही पक्षाच्या सदस्यत्व सोडून देईल अशी कुठलीही कृती केलेली नाही. पण तुम्ही पक्षाच्या विचारधारेनुसार काम करत असाल तर २००५ मध्ये बाळासाहेब जिवंत असताना तुम्ही पक्ष का सोडला, असा सवाल करण्यात आला.

## मार्डी येथे अपघातात मजूर ठार

**सोलापूर :** मार्डी ( उत्तर सोलापूर) येथे वेगाने जाणाऱ्या डंपरच्या धडकेने गुलाम मोहम्मद फकीर (वय-४५) हे वीटभट्टी कामगार जखमी होऊन उपचारा दरम्यान मयत झाले.

गुलाम फकीर हे बुधवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास दुचाकीवरून कारंबा ते मार्डीच्या दिशेने निघाले होते. त्यावेळी डंपरपने धडक दिल्यानेते गंभीर जखमी झाले. त्यांना यासीन (भाऊ) यांनी रुग्णालयात दाखल केले असता ते मयत झाले. या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली. पोलिसांनी डंपर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आजवर पास केलेल्या फाईली!

कल्याण
690-56-178

मुंबई
390-26-178

# सुराज्यचा दणका: अशोक चौकातील रेशन दुकानाची तपासणी

### अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांना आज अहवाल सादर होणार

सुराज्य/सोलापूर

अशोक चौकातील दुकानातून धान्याचा काळाबाजार जात असल्याचे वृत्त दैनिक सुराज्यने गुरुवारच्या अंकामध्ये प्रसारित केले होते. या वृत्ताची दाखल घेऊन अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांनी क विभागाचे परिमंडल अधिकारी अनिल गवळी आणि पुरवठा निरीक्षक राजेश यमपुरे दोघांच्या माध्यमातून दुकानाची तपासणी केली. या दुकानांमध्ये तपासणीच्या वेळी अनेक तपावत आढळून आल्याच्या आल्याची माहिती मिळाली असून या सर्व गोष्टींचा अहवाल आज अन्नधान्य वितरण अधिकारी सुमित शिंदे यांना सादर केला जाणार आहे.






या दुकानातून शासकिय धान्य काळाबाजारत जात असल्याचे निदर्शनास आले होते. या संदर्भात अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी लक्ष देऊन दुकानदारावर फौजदारी कारवाई करावी अशी मागणी शिधापत्रधारिकांनी केली होती. एकीकडे दुकानदार हायटेक होत असताना गोरगरिबांच्या तोंडाचा घास पळून घेऊन आपले उखळ पांढरे करणाऱ्या या दुकानदारांच्या विरोधात तक्रारी प्राप्त झाल्यानंतर गुरुवारी स.क.परिमंडल अधिकारी अनिल गवळी आणि पुरवठा निरीक्षक राजेश यमपुरे यांनी थेट दुकान गाठले दुकानातील सर्व कागदपत्रांची, धान्याचा साठा, रजिस्टर या गोष्टींची या गोष्टींची तपासणी केली. यामध्ये तफावत आढळून आल्याची माहिती मिळाली आहे. मात्र या गोष्टींचा अहवाल आज अन्नधान्य वितरण अधिकारी यांना परिमंडल अधिकारी सादर करणार आहेत. या तपासणीवेळी दुकानातील पात्र लाभार्थ्यांची देखील जबाब नोंदवण्यात आले असून चौकशी करण्यात आली आहे तक्रारीमध्ये तथ्य असल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास आल्याचे समजते.

शासन नियमानुसार वैयक्तिक नावावर दुकान असल्यास मदतनीस अथवा व्यवस्थापक ठेवता येत नाही कायद्याने गुन्हा आहे. मात्र सदरचे दुकान एकाच्या नावे आहे. दुसरा दुकान चालवत असल्याचा प्रकारदेखील यावेळी निदर्शनास आला आहे.

प्राप्त तक्रारीनुसार दोन अधिकाऱ्यांकडून दुकानाची तपासणी केली आहे. तपासणी अहवाल आज आपल्याला प्राप्त झाल्यानंतर दुकानदारावर कारवाई केली जाईल.

**- सुमित शिंदे, अन्नधान्य वितरण अधिकारी**